# भुजबळ नॉलेज सिटी

## मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, नाशिक - ४२२००३

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०१९

## मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी मध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा

**तारीख :- ११ जानेवारी २०१९.**

**वेळ -: सकाळी १०.३० ते सायंकाळी १२.३० पर्यंत**

**ठिकाण -: मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी.**

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी व संवर्धनासाठी राज्यभर दि. १ जानेवारी ते दि.१५ जानेवारी हा कालावधी प्रतिवर्षी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" म्हणुन साजरा करण्यात येतो. या उपक्रमास अनुसरून इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी मध्ये 'मराठी भाषेचे संवर्धन पंधरवड्यात' व्याख्यान आणि निबंध स्पर्धा,हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करण्यात आली. मराठा हायस्कूलचे क्रीडा प्रशिक्षक,शिव चरीत्र अभ्यासक श्री. सोपान वाटपाडे (पाटील), यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांनी प्रास्ताविक मांडले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय ग्रंथपाल श्री. नितीन भामरे यांनी केला. प्रवाहाबरोबर जातांना मराठीची कास सोडू नका असे प्रतिपादन श्री. वाटपाडे सर यांनी केले, त्याच बरोबर त्यांनी संत नामदेव, ज्ञानेश्वर, कवी कुसुमाग्रज, अण्णाभाऊ साठे, शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले इत्यादीचे दाखले देत त्यांनी मराठी भाषेचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमास १११ विद्यार्थी व २० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

'मराठी भाषेचे संवर्धन पंधरवड्यात' आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. जाधव रोहिणी,द्वितीय क्रमांक कु. साळवे सिद्धार्थ यांनी उत्कृष्ट शैलीत निबंध लेखन केले, तसेच मराठी हस्ताक्षर स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. नीलम पटांगरे, द्वितीय क्रमांक कु. लिना शिरसाठ यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. निकिता राठोड हिने केले, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी, प्रा. एस. डी. पाटील, ग्रंथपाल श्री. नितीन भामरे, उपग्रंथपाल आरती कागदे , ज्योती जाधव, श्री. हेमंत निकम, तसेच इतर कर्मचार्यांनी विशेष प्रयत्न केले. आभार प्रदर्शन कु. सुमीत गुंजाळ याने केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरता डॉ. सौ शेफाली भुजबळ व प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांचे मार्गदर्शन लाभले.

**<u>कार्यक्रमाचे समन्वयक :-</u>**

प्रा. श्री. एस. डी. पाटील

श्री. नितीन भामरे (ग्रंथपाल)

सौ.आरती कागदे (उपग्रंथपाल)

सौ.ज्योती जाधव (ग्रंथालय सहायक)

श्री. हेमंत निकम

# भुजबळ नॉलेज सिटी

# मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, नाशिक - ४२२००३

## <u>मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०१९</u>



१. प्रमुख अतिथी श्री. सोपान वाटपाडे यांचा सत्कार करतांना माननीय प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर सर.




२. कार्यक्रमाचे सूत्र संचालन करतांना कु.निकिता राठोड




३. ‘मराठी भाषेचे संवर्धन दिनानिमित्त’ उपस्थितांना मार्गदर्शन करतांना माननीय प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर सर.




४. प्रमुख पाहुणे श्री. सोपान वाटपाडे यांचा परिचय करून देतांना ग्रंथपाल श्री. नितीन भामरे.




५. प्रमुख पाहुणे श्री. सोपान वाटपाडे मराठी भाषेचे संवर्धन या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन करतांना.





६. कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी